भारतीय विद्या भवनचे

# सरदार पटेल अभियांत्रिकी महाविद्यालय

भवन्स कॅम्पस, मुन्शी नगर, अंधेरी (पश्चिम), मुंबई ४०००५८.

## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३२ व्या जयंतीनिमित्त व्याख्यान व चर्चासत्र

### "आरक्षण: वास्तव आणि विपर्यास"

---

भारतरत्न **डॉ. बाबासाहेब आंबेडकर** यांच्या १३२ व्या जयंतीनिमित्त, आपल्या महाविद्यालयाच्या **प्रशिक्षण व आस्थापना विभागाने**, **गुरुवार दि. १८ मे २०२३ रोजी दुपारी ३.०० वाजता**, आपल्या महाविद्यालयातील **सेमिनार हॉल ११९ मध्ये**, **"आरक्षण: वास्तव आणि विपर्यास"** या विषयावर, प्रसिद्ध पत्रकार, आंबेडकरी चळवळीचे कार्यकर्ते आणि सामाजिक प्रश्नांचे अभ्यासक **श्री. प्रशांत रूपवते आणि श्री. सिद्धार्थ मोकळे** यांचे व्याख्यान व चर्चासत्र आयोजित केलेले आहे.

**श्री. प्रशांत रूपवते:**

- सुमारे दोन दशकापेक्षा जास्तकाळ पत्रकारितेत कार्यरत, १९९६पासून वृत्तपत्रामध्ये लेखनास सुरुवात
- मास कम्युनिकेशनमध्ये पदव्युत्तर पदवी आणि सेंट झेविअर्स महाविद्यालयातून पत्रकारितेची पदविका प्राप्त
- 'आपलं महानगर', दैनिक 'महानगर', 'दैनिक लोकमत', बेळगाव तरुण भारत दैनिक इ. वृत्तपत्रांमध्ये काम
- या कार्यकाळात शिक्षण, न्यायालय आणि मंत्रालय आदी बीट तथा विभागाचे वार्तांकन
- २००२-०३मध्ये भूम-परांडा इथे झालेल्या पारधी हत्याकांड नंतर 'संपर्क' संस्थेने बालकृष्ण रेणके यांच्या अध्यक्षतेखाली स्थापिलेल्या 'सत्यशोधन समिती'मध्ये सहभाग
- अहमदनगर जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील मौजे शिंदे या गावातील दलितांवर टाकण्यात आलेल्या बहिष्कार प्रकरणी 'डॉ. आंबेडकर राईटस लॉ नेटवर्क या संस्थे'ने स्थापलेल्या २००४-०५ यावर्षीच्या सत्यशोधन समितीमध्ये सहभाग
- २००४ ते २०१३ या दरम्यान, मुंबई उच्च न्यायालय, टाडा, सत्र न्यायालय आणि दिल्ली येथील सर्वोच्च न्यायालयांमधील खटल्यांचं वार्तांकन
- त्यामध्ये प्रामुख्याने मुंबईत झालेले ९३ बॉम्बस्फोटासह इतर बॉम्बस्फोटाचे खटले, मुंबईवर झालेला दहशतवादी हल्ला, प्रमोद महाजन हत्येचा खटला आदीचां समावेश
- सध्या मुक्त पत्रकार म्हणून लोकसत्ता, दिव्य मराठी या दैनिकांमध्ये विविध विषयांवर लेखन सुरू
- त्याचबरोबर जातपंचायती, आरक्षण आणि ओबीसी धर्मांतर या संबंधाने अभ्यास सुरू
- '**पदोन्नती आणि आरक्षण**' या पुस्तकाचं संपादन आणि लेखन त्याचप्रमाणं '**विचंवाच तेल**' या पुस्तकाचे सहलेखन

**श्री. सिद्धार्थ मोकळे:**

- विद्यार्थी दशेपासून आंबेडकरी चळवळीत कार्यरत
- १० वर्षे महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती मध्ये कार्यरत, अनेक भोंदू बाबा - बुवांचा भांडाफोड केला
- पत्रकारितेच्या क्षेत्रात काम करण्याचा प्रदिर्घ अनुभव. दैनिक आपलं महानगर, साप्ताहिक चित्रलेखा, दैनिक पुढारी मध्ये उपसंपादक पदावर काम केले.
- रूईया महाविद्यालयात पाच वर्षे पत्रकारितेच्या विद्यार्थ्यांना अभ्यागत व्याख्याता म्हणून अध्यापनाचा अनुभव
- शिक्षण, रोजगार, आरोग्य, सुरक्षा या मूलभूत बाबींवर काम करणाऱ्या आत्मभान संघटनेचे संस्थापक अध्यक्ष
- विविध वृत्त वाहिन्यांवरील चर्चासत्रात सहभाग
- विविध सामाजिक विषयांवर राज्यभरात व्याख्याने

आयआयटी मुंबईत काही दिवसांपूर्वी झालेल्या दर्शन सोलंकी या विद्यार्थ्याच्या आत्महत्येनंतर आरक्षण आणि गुणवत्ता यांची पुन्हा चर्चा सुरू झाली आहे. त्या अनुषंगाने डॉ. आंबेडकरांनी आरक्षणाची तरतूद नेमकी कोणत्या कारणासाठी सुचविली आणि आरक्षणामुळे गुणवत्तेचा खरोखर ह्रास होतो का? या ज्वलंत मुद्द्यांवर प्रकाश टाकण्यासाठी व विद्यार्थ्यांशी चर्चा करण्यासाठी या व्याख्यानाचे व चर्चासत्राचे आयोजन करण्यात आलेले आहे.

आपल्या महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी या कार्यक्रमास आवर्जून उपस्थित रहावे असे आवाहन मी करतो.

**प्रा. डॉ. मोहन मुरुडी**
**प्र. प्राचार्य**

**दि.** १५ मे २०२३